MHKO100001862024

## आदेश निशाणी क्र. २२

वादी तर्फे वारस यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत वादी सुभाना भैरू कांबळे हे दिनांक १६/१२/२०२४ रोजी मयत झाले असलेने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर दिलेले म्हणणे वाचले. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी हे मयत असलेचा कोणताही पुरावा सादर केला नाही. वादी यांनी सदरचा दावाकायम मनाई साठी दाखल केला आहे. वादी सुभाना भैरू कांबळे हे दिनांक १६/१२/२०२४ रोजी मयत झालेचे वर्णन यादी निशाणी १९ वर दाखल मृत्यू दाखल्यावरून दिसून येते. सदरचा अर्ज हा दिनांक ११/२२/२०२५ रोजी प्रकरणात दाखल केलेला आहे. म्हणजेच वादी सुभाना भैरू कांबळे यांच्या मृत्यूनंतर ९० दिवसात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे व तो मुदतीत आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी दाव्यात १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करुन पुढील पुर्तता सत्वर करावी.

३. अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ करणेत येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.05.07 11:38:46 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०६/०५/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज